मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (जिल्हा वार्षिक योजना).

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यसाय विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक- डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१)**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक ,**
**मंत्रालय, मुंबई -४०००३२**
**दिनांक :- २७ ऑगस्ट, २०२६**

वाचा :- १) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यसाय विभागाचा शासन निर्णय क्र. डीएएचडी-१४०१७/०१/२०२६-एएच-४ (E-१५४५०९१), दि.०९.०३.२०२६.
२) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र.पशुधन-१/प्र.क्र ७११/पसं-१३/३००७/२०२६,औंध,पुणे दि.२७.०५.२०२६.
३) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र.पशुधन-१/प्र.क्र ७११/पसं-१३/३०७७/२०२६,औंध, पुणे दि.१२.०६.२०२६.

**शासन शुध्दीपत्रक:-**

आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या वाचा क्र.२ व ३ येथील पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने या विभागाच्या वाचा क्र. १ येथील दि. ०९.०३.२०२६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (जिल्हा वार्षिक योजना) मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. परिच्छेद क्र. ६ मधील “दुधाळ जनावरे गटवाटप योजना” या योजनेच्या “अटी व शर्ती” मधील क्र. २ येथील “पात्र लाभार्थ्यांने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्यांने गठीत समिती समवेत दुधाळ गाय / म्हैस गटाची राज्याबाहेरून खरेदी करावी”

या वाक्याऐवजी

“पात्र लाभार्थ्यांने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या

कालावधीत लाभार्थ्यांने गठीत समिती समवेत त्याच्या पसंतीनुसार राज्यातील मान्यता प्राप्त ब्रीडर फार्म किंवा राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गत ब्रीड मल्टीपिकेशन फार्म्समधून किंवा इतर राज्यातून दुधाळ जनावरांची खरेदी करावी” असे वाचावे.

२. शासन निर्णयातील अंमलबजावणीची कार्यपध्दती” या सदराखालील (ब) “लाभार्थी निवड” येथील

“ (३) “प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी ऑन लाईन पध्दतीने करुन लाभार्थी निवड समितीमार्फत याद्दच्छीक (Random) पध्दतीने पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.”

या वाक्याऐवजी

“(३) ऑन लाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी करुन लाभार्थी निवड समितीमार्फत “प्रथम येणाऱ्यास प्राधान्य” या तत्वाने लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेताक २०२६०८२७१६४६०२८५४५ आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.08.27 16:47:40 +05'30'

**(नि.भा.मराळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत: -**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
४. मा.विधानसभा /विधान परिषद सदस्य( सर्व)
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव (वित्त) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२.
७. सचिव (नियोजन व विकास आयुक्त ) मंत्रालय मुंबई ३२
८. संचालक३२- मुंबई ,मंत्रालय ,माहिती व जनसंपर्क संचालनालय ,
९. आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. सर्व जिल्हाधिकारी

११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२. सर्व प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
१३. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
१४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई-३२
१५. निवडनस्ती -पदुम ४